MHSO100008212022

**विशेष दिवाणी दावा क्र.३६१/२०२२ मधील नि.क्र.१८६ खालील आदेश.**

प्रतिवादी क्र.९ ने सदरचा अर्ज दावा कलम १क / २ यातील जमीन गट क्र.७७६/१ पैकी ०.७७.५ हे.आर पोटखराबा ०.२० हे.आर. या मिळकतीमधील ऊसाचे पीक कारखान्याला गाळपासाठी पाठविण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, त्याने नि.क्र.१६७ वर नमुद केलेल्या मिळकतीमधील ऊस सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर या कारखान्याकडे गाळपासाठी पाठविण्यासाठी अर्ज दिला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने मंजूर केला आहे, परंतु ता.०५.०२.२०२६ रोजी सदर कारखान्याचे गाळप बंद झाले आहे. त्यामुळे सदरचा ऊस नि.क्र.१६७ वरील आदेशाप्रमाणे वर नमुद कारखान्याऐवजी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर, निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे व दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यापैकी जो कारखाना सुरु असेल, त्याला पाठविणेस परवानगी मागितली आहे. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जास वादीने जबाब दिला असून त्याने त्याचे जबाबात प्रतिवादी क्र.९ च्या अर्जातील कथन नाकारले आहे. त्याने पुढे कथन केले आहे की, सदरचा अर्ज कायदेशीर नाही. नि.क्र.१६७ च्या आदेशाविरुध्द वादीने वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल केले आहे. त्यामुळे नि.क्र.१६७ च्या आदेशात बदल करता येणार नाही. म्हणून शेवटी त्याने सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्यांवर मी माझे कारणांसह खालील निष्कर्ष नोंदवीत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ व २ बाबतः–

४. मी प्रतिवादी क्र.९ तर्फे विद्वान वकील श्री.क्षीरसागर व वादीतर्फे विद्वान वकील श्री.फडे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.९ चे विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, नि.क्र.१६७ वरील आदेशान्वये सदरचा ऊस हा सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर यांच्याकडे गाळपासाठी पाठवायचा आदेश पारित करण्यात आला आहे, परंतु सदरचा कारखाना ता.०५.०२.२०२६ रोजी

बंद झाला आहे. त्यामुळे सदरचा ऊस सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर ऐवजी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर, निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे व दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यापैकी जो कारखाना सुरु असेल, त्याला पाठविणेत यावा. याउलट,वादीचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी नि.क्र.१६७ च्या आदेशाविरुध्द मा.जिल्हा न्यायालय, माळशिरस येथे अपिल दाखल केले आहे. त्यामुळे सदरच्या आदेशात बदल करता येणार नाही. म्हणून शेवटी त्यांनी सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

५. मी सदरचे प्रकरणातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. नि.क्र.१६७ वरील आदेशान्वये मौजे–महाळुंग येथील जमीन ग.क्र.७७६/१ पैकी ०.७७.५ हे.आर पोटखराबा ०.२० हे.आर. या मिळकतीमधील ऊसाचे पीक न्यायालयीन आयुक्त यांचेमार्फत सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर कारखान्याला गाळपासाठी पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत. नि.क्र.१६७ वर ता.०४.०२.२.२०२६ रोजी आदेश पारित करण्यात आला आहे. त्यानंतर त्याच दिवशी वादीने सदरचा आदेश स्थगित करण्यासाठी नि.क्र.१८१ वर अर्ज दिला आहे.

६. सदरच्या अर्जानुसार नि.क्र.१६७ वरील आदेश ता.०६.०२.२०२६ पर्यंत स्थगित केला आहे. दरम्यानचे काळात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर

कारखाना हा ता.०५.०२.२०२६ रोजी बंद झालेला आहे. त्यानंतर वादीने नि.क्र.१६७ च्या आदेशाविरुध्द मा.जिल्हा न्यायालय, माळशिरस यांच्याकडे कि.दि.अपील क्र.०४/२०२६ हे दाखल केले असून त्यामध्ये अपीलाचा निकाल लागेपर्यंत नि.क्र.१६७ चा आदेश स्थगित ठेवण्यासाठी नि.क्र.५ वर अर्ज दिला होता. सदरचा नि.क्र.५ चा अर्ज मा.जिल्हा न्यायाधीश, माळशिरस यांनी ता.१७.०२.२०२६ रोजी नामंजूर केला आहे. त्यानंतर वादीने सदरच्या नि.क्र.५ च्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी नि.क्र.१६७ वरील आदेश स्थगित करण्यासाठी नि.क्र.१९ वर अर्ज दिल्याचे दिसून येते. मा.जिल्हा न्यायाधीश, माळशिरस यांनी नि.क्र.१९ वरील आदेशान्वये नि.क्र.१६७ च्या आदेशास ता.२४.०२.२०२६ पावेतो स्थगिती दिली आहे.

७. मी वर नमुद केल्याप्रमाणे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर कारखाना हा ता.०५.०२.२०२६ रोजी बंद झालेला आहे. त्यामुळे सदरचा ऊस दुस–या कारखान्याला पाठविला नाही तर त्याचे नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादी क्र.९ ने अर्जात विनंती केल्याप्रमाणे सदरचा ऊस कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर, निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे व दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यापैकी जो कारखाना सुरु असेल, त्याला पाठविणे उचित होईल. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदवित आहे व त्यामुळे मुद्दा क्र.२ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारित करीत आहे.

 **वि.दि.दा.क्र.३६१/२०२२.**

**नि.क्र.१८६ खालील आदेश**.

## **आदेश**

१. प्रतिवादी क्र.९ चा नि.क्र.१८६ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि.क्र.१६७ वरील आदेशास अधिन राहून न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे–महाळुंग, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथील दावा मिळकत गट क्र.७७६/१ यापैकी ०हे.७७.५आर पोटखराबा ०हे.२०आर या मिळकतीमधील ऊसाचे पिक तोडणी यंत्रणेमार्फत तोडून तो ऊस कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापूर, निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, ता.इंदापूर, जि.पुणे व दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर, ता.माळशिरस, जि.सोलापूर यापैकी जो कारखाना सुरु असेल, त्याला पाठविणेत यावा

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.02.25 16:15:25 +0530

दि.२५.०२.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माळशिरस.

**<u>वि.दि.दा.क्र.३६१/२०२२.</u>**

**<u>नि.क्र.१८६ खालील आदेश</u>**.

शेरा

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री.म.पां.सदाफुले.

कोर्टाचे नाव – दि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२५.०२.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२५.०२.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२५.०२.२०२६.

आदेशा अपलोड केल्याचा दि.२५.०२.२०२६.

स्वाक्षरित/-

(श्री.म.पां.सदाफुले)

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.